**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर


शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२३-२४/ ९६ दिनांक:- 05 JAN 2024

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता, डीबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरी करिता पाठविण्याबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध झालेली असल्याने, आपल्या संस्थेतील शै. वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे संबंधित योजनेंअंतर्गत शिष्यवृत्तीचे अर्ज डीबीटी पोर्टलवर (नवीन/नुतनीकरण) भरण्याकरिता संस्थास्तरावरुन विद्यार्थ्यांना सुचना देवून पात्र विद्यार्थ्यांकडून संस्थास्तरावरुन अर्ज भरून घेण्यात यावे. जेणे करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदरहू शिष्यवृत्तीचा लाभ वेळेमुदतीत घेता येईल.

तसेच संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज, संस्थेला दिलेल्या दोन्ही लॉगीन मधून संबंधित योजनेंच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून वेळोवेळी अचुक पात्र असलेंले अर्ज मंजूरीस्तव पाठविण्याबाबत यावे. जेणे करून वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये प्राप्त अनुदान खर्ची टाकणे शक्य होईल.

सदरहू योजनेंस पात्र नसलेले चुकीचे किंवा वारंवार त्रुटी सहीत मंजूरीस्तव (approval) करीता पाठविण्यात आलेल्या अर्जाबाबत आपणास कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता शिष्यवृत्तीचे अर्ज थेट रिजेक्ट करण्यात येईल. याची, प्राचार्य आणि शिष्यवृत्ती हाताळणा-या अधिकारी / कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई, (कार्यासन क्र. १८) यांना माहिती करिता सविनय सादर.